**सं.फौ.ख.क्र.८६८/२०२०**
**सरकार वि. सुनिल**
**नि.क्र.१२च्या खाली**

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शंकर अशोकराव पनत.
वय ३० वर्ष, व्यवसाय– शेती.
राह.सेवानंदपुर, तह.समुद्रपुर, जि.वर्धा.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी माझ्यासमक्ष पंचनामा करण्यासाठी समन्स पत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती आहे. सहीला **निशाणी क्र.१४** देण्यात आला. पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.१५** देण्यात आले. टी साक्ष देत आहे.

<u>सरतपास संपला.</u>

**<u>आरोपीतर्फे ॲड. एस.एस. रामटेके यांनी उलटतपास नाकारला.</u>**

२. मी सेवानंदपुर येथील कायम रहिवासी आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या गावात घटना घडली तेथील मी कायम रहिवासी नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावरील गावातुन जात होतो त्यावेळी पोलिसांनी मला बोलावले व मला सही कर म्हटले मी सही केली. माझे शिक्षण १५ वी झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर गेलो नाही व माझ्यासमक्ष घटनास्थळपंचनामा तयार केला नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, माझ्या आधिच पंचनामा तयार केला होता मी फक्त त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर मला माहीती नाही मी फक्त त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर गेलो नाही माझ्यासमक्ष कोणती कारववाई केली नाही त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पुर्ण.</u>

<u>फेरतपास काही नाही.</u>

वा.दा.ब.अ.सा. — समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१३.०१.२०२४

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड